अनेकान्त एज्युकेशन सोसायटीचे,

# तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती

स्वायत्त

Course Structure for T.Y.B.A.

विषय : मराठी S-3

| Semester | Paper Code | Title of Paper | Name of Credit |
|---|---|---|---|
| I | MARSPL3502 | साहित्यविचार | 03 |
| II | MARSPL3602 | साहित्यविचार | 03 |

---

**वस्तुनिष्ठ प्रश्न**

१. हे सारस्वताचे गोड। तुम्हीचि लाविले जे झाड।
तरी अवधानामृते वाड। सिंपोनि कीजे।।'' ही उक्ती कोणाची?
अ) संत ज्ञानेश्वर ब) संत नामदेव क) संत तुकाराम ड) मुकुंदराज

२. ''काव्ययशसे, अर्थकृते, व्यवहारविंदे, शिवेतरक्षतये
सद्यपरनिवृत्तये, कान्तासम्मित तयोपदेशयुजे।''
या संस्कृतकारिकेत सहा साहित्यविषयक प्रयोजने कोणी सांगितली आहेत?
अ) विश्वनाथ ब) गंगाधर क) मम्मट ड) आनंदवर्धन

३. 'शब्द' आणि 'अर्थ' यांचे सहितत्त्व म्हणजे काव्य असे कोणी म्हटले आहे?
अ) भामह ब) कुंतक क) जगन्नाथ ड) दण्डी

४. 'साहित्य म्हणजे जीवनभाष्य' असे कोणी म्हटले आहे?
अ) क्रोचे ब) कोलरिज क) मॅथ्यू अनॉल्ड ड) मिल्टन

५. साहित्याचे मूलद्रव्य कोणते?
अ) वाक्य ब) पद क) कल्पना ड) शब्द

६. साहित्याचे प्रामुख्याने किती प्रकार कल्पिले गेले आहेत?
अ) १ ब) २ क) ३ ड) ४

७. साहित्याला पर्यायी कोणती संज्ञा कल्पिली जाते?
अ) सामग्री ब) वाङ्.मय क) साहित्य ड) वस्तू

८. ललित साहित्य हे वाचकांच्या भावनांना आवाहन करते तर ललितेत्तर साहित्य हे .......
अ) विचारांना ब) कृतींना क) संकल्पनांना ड) मानसिकतेला

९. साहित्यातून व्यक्त होणारे अनुभवाचे विशेष कोणते?

अ) संवेदनात्मकता ब) भावनात्मकता क) वैचारिकता ड) वरील सर्व

१०. संस्कृत साहित्यशास्त्रात ‘काव्य’ हा शब्द कशासाठी वापरला गेला आहे?

अ) ललित वाड्.मय ब) ललितेत्तर वाड्.मय क) पद्यमय साहित्य ड) शास्त्र व तत्त्वज्ञानपर लेखन

११. ‘काव्यूम ग्राहयम् अलंकारात् सौंदर्यम् अलंकार :’ हे मत कोणाचे आहे?

अ) भामह ब) दण्डी क) वामन ड) आनंदवर्धन

१२. वामनाच्या काव्यलक्षणातील ‘अलंकार’ या शब्दाचा अर्थ काय?

अ) सौंदर्य ब) आनंद क) आभूषण ड) रस

१३. भरतमुनी यांनी लिहिलेल्या ग्रंथाचे नाव काय?

अ) रसतरंगिणी ब) काव्यशास्त्र क) ध्वनितरंग ड) नाटयशास्त्र

१४. शब्दाच्या ‘अभिधा’ या शक्तीचा अर्थ कोणता आहे?

अ) लक्ष्यार्थ ब) वाच्यार्थ क) व्यंग्यार्थ ड) वरीलपैकी सर्व

१५. ‘औचित्य’ हा विचार कोणी मांडला?

अ) वामन ब) आनंदवर्धन क) विश्वनाथ ड) क्षेमेंद्र

१६. वामनाने काव्याचे प्राणभूत तत्त्व कोणते मानले?

अ) रीती ब) व्यंजना क) ध्वनी ड) सौंदर्य

१७. ‘शब्दार्थो सहितो काव्यम्’ ही व्याख्या कोणाची?

अ) वामन ब) भामह क) विश्वनाथ ड) आनंदवर्धन

१८. ‘वक्रोक्ती हे काव्याचे जीवित आहे’ असे कोणी मानले आहे?

अ) क्षेमेंद्र ब) भरत क) कुंतक ड) आनंदवर्धन

१९. ‘ध्वानीसिध्दांत’ कोणी मांडला?

अ) वामन ब) भरत क) विश्वनाथ ड) आनंदवर्धन

२०. ‘रमणीयार्थ प्रतिपादक : शब्द काव्यम्’ असे कोणी म्हटले आहे?

अ) जगन्नाथ ब) भरत क) विश्वनाथ ड) आनंदवर्धन

२१. ‘‘ननु शब्दार्थौ काव्यम्’’ अशी काव्याची व्याख्या कोणी केली आहे?

अ) रूद्रट ब) भरत क) वामन ड) मम्मट

२२. साहित्याची व्याख्या करत असताना पाश्चात्य साहित्यशास्त्रज्ञांनी कोणत्या गोष्टींना प्राधान्य दिले आहे?

अ) कल्पना, प्रज्ञा, रस ब) कल्पना, प्रज्ञा, लयबध्दता क) कल्पना, प्रज्ञा, ध्वनी ड) कल्पना, प्रज्ञा, रीती

२३. ‘उत्तम शब्दांची उत्तम रचना म्हणजे काव्य’ ही साहित्याची व्याख्या कोणी केली आहे?

अ) वर्डस्वर्थ ब) कोलरिज क) ॲर्नोल्ड ड) कार्लाईल

२४. 'उत्कट भावनांचा उत्स्फूर्त उद्रेक म्हणजे काव्य' ही साहित्याची व्याख्या कोणी केली आहे?

अ) वर्डस्वर्थ ब) अर्नोल्ड क) कोलरिज ड) कार्लाईल

२५. 'साहित्याची व्याख्या करताना सौंदर्याची लयबध्द निर्मिती' या घटकाला विशेष महत्त्व देणारा साहित्यज्ञ कोण?

अ) कोश ब) वर्डस्वर्थ क) केबल ड) एडगर ॲलन पो

२६. 'गंगालहरी' हे काव्य कोणी रचले?

अ) भरत ब) विश्वनाथ क) जगन्नाथ पंडित ड) रूद्रट

२७. साहित्याचे 'आनंद' हे प्रयोजन कोणाचे आहे?

अ) वाचकाचे ब) लेखकाचे क) लेखक व वाचकाचे ड) साहित्याचे

२८. मम्मटाने सांगितलेले 'उपदेशा'चे प्रयोजन हा कोणी केलेला उपदेश आहे?

अ) पित्याने ब) पत्नीने क) शिक्षकांनी ड) मित्राने

२९. छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळात कोणत्या कवीला वैभव मिळाले?

अ) कवी विश्वनाथ ब) कवी जगन्नाथ पंडित क) कवी भूषण ड) कवी खरदूषण

३०. काव्यव्यापाराची तीन केंद्रे कोणती आहेत?

अ) लेखक, साहित्यकृती, वाचक ब) लेखक-साहित्यकृती प्रकाशक

क) लेखक, प्रकाशक, वाचक ड) लेखक, विक्रेता, वाचक

३१. 'कलेसाठी कला' या मताचा मराठीत कोणी पुरस्कार केला?

अ) ग. त्र्यं. माडखोलकर ब) ग. त्र्य. देशपांडे

क) वि. स. खांडेकर ड) ना. सी. फडके

३२. 'जिज्ञासातृप्ती' हे साहित्य प्रयोजन .........

अ) लेखकनिष्ठ आहे ब) लेखकनिष्ठ नाही

क) लेखक-वाचकनिष्ठ आहे ड) वरीलपैकी एकही नाही

३३. 'अपूर्व वस्तुनिर्माणक्षमप्रज्ञा' म्हणजे 'प्रतिभा' अशी प्रतिभेची व्याख्या कोणी केली आहे?

अ) दण्डी ब) हेमचंद्र क) अभिनवगुप्त ड) रूद्रट

३४. 'प्रतिभा म्हणजे नवनवीन उन्मेष धारण करणारी प्रज्ञा' अशी प्रतिभेची व्याख्या कोणी केली आहे?

अ) अभिनवगुप्त ब) वाग्भट क) रूद्रट ड) हेमचंद्र

३५. प्रतिभावंताच्या निर्मितीक्षणाची जी उत्कृष्ट अवस्था असते तिला काय म्हणतात?

अ) निवड ब) ग्रहण क) स्मरण ड) स्फूर्ती

३६. उत्प्रेक्षा म्हणजे ......

अ) कल्पनांचा स्वैर विहार    ब) स्मरणाचा स्वैर विहार

क) स्फूर्तीचा स्वैर विहार    ड) मनाचा स्वैर विहार

३७. 'प्रतिभा ही वेडाची बहीण आहे' हा विचार कोणी मांडला?

अ) बा. सी. मर्ढेकर    ब) लोंब्रोसो    क) कोलारिज    ड) एडगर ॲलन पो

३८. 'प्रतिभाशक्ती म्हणजे कवित्व बीजरूपी विशिष्ट संस्कार आहे' हे कोणाचे मत आहे?

अ) अभिनवगुप्त    ब) वाग्भट    क) हेमचंद्र    ड) मम्मट

३९. कल्पनेची स्वैरभरारी म्हणजे काय?

अ) कल्पनाशक्ती    ब) सत्य    क) उत्पेक्षण    ड) असत्य

४०. कवीची प्रतिभा कशी असते?

अ) विश्लेषणात्मक    ब) संश्लेषणात्मक क) तांत्रिक    ड) अभ्यासू

४१. शास्त्रज्ञांची प्रतिभा कशी असते?

अ) संश्लेषणात्मक    ब) विश्लेषणात्मक क) तांत्रिक    ड) अभ्यासू

४२. ध्वनित अर्थ प्रकट करणाऱ्या शब्दाला काय म्हणतात?

अ) व्यंजक    ब) वाचक    क) लक्ष्यक    ड) लक्षणिक

४३. मुख्यार्थापेक्षा अधिक अर्थ व्यक्त करणाऱ्या शक्तीला ..... म्हणतात.

अ) अभिधा    ब) लक्षणा    क) व्यंजना    ड) शाब्दी

४४. काव्याला सर्वाधिक अनुकूल असणारी शब्दशक्ती कोणती?

अ) अभिधा    ब) लक्षणा व व्यंजना    क) व्यंजना    ड) सरला

४५. समीक्षेतील महत्त्वाची संकल्पना कोणती आहे?

अ) समीक्षा    ब) साहित्य    क) साहित्यप्रकार ड) काव्य

४६. साहित्यप्रकारांचा तात्त्विक विचार म्हणजे काय?

अ) साहित्यकृतीच्या वर्गीकरणाचा सिध्दांत    ब) साहित्यचर्चा

क) साहित्यप्रकारांची    ड) साहित्याची उत्पत्ती

४७. साहित्यप्रकारांच्या वर्गीकरणाची किती तत्त्वे सांगितली आहेत?

अ) तीन    ब) चार    क) सहा    ड) सात

४८. प्रस्तुतीकरण म्हणजे काय?

अ) मांडणी    ब) माहिती    क) सादरीकरण ड) पध्दती

४९. अनुभव प्रस्तुत करणाऱ्या लेखक, कवीस काय म्हणतात?

अ) लेखक ब) कवी क) प्रस्तुतकर्ता ड) साहित्यिक

५०. वाड्मयाचे वर्गीकरण का केले जाते?

अ) वाचनासाठी ब) माहितीसाठी क) समीक्षेसाठी ड) सूत्रबध्द अभ्यासासाठी

५१. 'साहित्यप्रकार' या संकल्पनेला कोणी विरोध केला आहे?

अ) कांट व क्रोचे ब) प्लेटो आणि ॲरिस्टॉटल

क) होरेस व हॉब्ज ड) डलास व जॉन ऑस्किर्न

५२. 'ॲरिस्टॉटलचे काव्यशास्त्र' हा ग्रंथ कोणी लिहिला आहे?

अ) र. बा. मंचरकर ब) गो.वि.करंदीकर क) भालचंद्र नेमाडे ड) भालचंद्र फडके

**Answer in One Sentence.**

१. रीतीला काव्याचे प्राणभूत तत्त्व कोणी मानले आहे?

२. 'औचित्यामुळे काव्याला सौंदर्य येते' हा विचार कोणी मांडला?

३. 'औचित्यविचार चर्चा' हा ग्रंथ कोणाचा?

४. मम्मटाने काव्याची व्याख्या कशी केली आहे?

५. रूद्रटाने काव्याची व्याख्या कशी केली आहे?

६. वक्रोक्ती म्हणजे काय? हा विचार कोणी मांडला.

७. 'रमणीय अर्थाचे प्रतिपादन करणारा शब्द म्हणजे काव्य' असे मत कोणी मांडले आहेत?

८. शब्दामध्ये कोणकोणत्या प्रकारच्या शक्ती आहेत?

९. भरतमुनी यांच्या ग्रंथाचे नाव काय?

१०. मम्मटाने काव्याची किती प्रयोजने सांगितली आहेत?

११. साहित्य व्यापाराची तीन केंद्रे कोणती?

१२. साहित्याची मुलभूत प्रेरणा कोणती आहे?

१३. लोंब्रोसो याने प्रतिभेविषयी कोणते मत मांडले?

१४. साहित्यनिर्मिती करणाऱ्या मानसिक शक्ती कोणत्या?

१५. 'भावयित्री प्रतिभा' कोणाकडे असते?

१६. कारयित्री प्रतिभा कोणाकडे असते?

१७. साहित्याचे सर्वश्रेष्ठ प्रयोजन कोणते?

१८. आस्वाद म्हणजे काय?

१९. रसास्वादकाजवळ असणारे गुणविशेष स्पष्ट करा.

२०. कोणते प्रयोजन कालबाहय मानले गेले आहे?

२१. नाटयशास्त्र या ग्रंथाचा कर्ता कोण?

२२. आनंदवर्धनाच्या ग्रंथाचे नाव काय?

२३. शब्दशक्ती किती व कोणकोणत्या?

२४. साहित्याचे सर्वश्रेष्ठ प्रयोजन कोणते?

२५. बांधिलकीऐवजी ‘सामिलकी’ हा शब्दप्रयोग कोणी सुचविला आहे?

२६. भाषा हे ललित साहित्याचे माध्यम की साधन आहे?

२७. ‘जीवनासाठी कला’ असे साहित्याबद्‌दलचे प्रयोजन कोणी मांडले?

२८. ‘वक्रोक्ति जीवित’ या ग्रंथाचा कर्ता कोण?

२९. ‘शब्दार्थौ साहितौ काव्यम्‌ ही व्याख्या कोणाची?

३०. ध्वनिसिध्दांतांचा प्रवर्तक कोण?

३१. कोणत्या शब्दशक्तीमुळे शब्दाला सूचित अर्थ प्राप्त होतो?

३२. लेखकाकडे कोणती प्रतिभाशक्ती असते?

३३. ‘प्रतिभा ही वेडाची बहीण आहे’ असे कोणी म्हटले आहे?

३४. ‘सविकल्प समाधीची संकल्पना’ कोणी मांडली?

३५. शब्दाची पहिली व मुख्य शक्ती कोणती?

३६. ‘सूचकता’ हा कोणत्या शब्दशक्तीचा गुण आहे?

३७. साहित्याचे विविध प्रकार सांगा.

## Short Notes

१. साहित्याची प्रयोजने

२. लेखकसापेक्ष साहित्यप्रयोजने

३. वाचक सापेक्ष साहित्यप्रयोजने

४. आनंद हे सर्वश्रेष्ठ प्रयोजन

५. विरेचन - कॅथॉर्सिसचा सिध्दांत

६. साहित्याचे स्वरूप - वैशिष्ट्ये

७. शास्त्रीय वाड्.मय व ललित वाड्.मयातील भेद

८. साहित्यातील वास्तव व कल्पित

९. साहित्याचे शब्दरूप

१०. साहित्य लक्षणे

११. साहित्य म्हणजे जीवन भाष्य

१२. साहित्यातून व्यक्त होणाऱ्या अनुभवाचे विशेष

१३. साहित्यकृतीचे सेंद्रियत्व

१४. सूचकता

१५. साहित्याची कल्पितरूपता

१६. जिज्ञासापूर्ती जिज्ञासातृप्ती : एक साहित्य प्रयोजन

१७. जीवनासाठी कला

१८. साहित्यातील उपदेशाचे स्वरूप

१९. ग्रहण आणि धारणा शक्ती

२०. प्रतिभा हा सर्वोत्तम घटक

२१. कल्पनाशक्तीची संकल्पना

२२. चमत्कृती

२३. प्रतिभाव्यापार व स्वप्न व्यापार

२४. स्फूर्ती स्वरूप व कार्य

२५. लेखकाची अनुभव समृध्दी

२६. लेखकाची संवेदनक्षमता

२७. 'प्रौढत्वी निजशैशवास जपणे बाणा कवीचा असे'

२८. आशय तशी शैली

२९. साहित्यप्रकार तशी शैली

३०. लेखक तशी शैली

३१. साहित्यातील सामाजिकता

३२. साहित्यिकांची बांधिलकी

३३. ललित साहित्यात प्रकट होणारी बांधिलकी

३४. अभिरूची आणि सौंदर्यदृष्टी

३५. अभिरूची व औचित्य

३६. व्यवहारभाषा आणि ललित साहित्याची भाषा

३७. प्रतिमा व रूपक

३८. साहित्याची बांधिलकी

३९. साहित्यप्रकाराची संकल्पना

४०. कादंबरीचे स्वरूपविशेष

४१. साहित्याच्या वर्गीकरणाची तत्त्वे

४२. रसविघ्ने / रसास्वादातील अडथळे

## Short Answer Questions

१. साहित्याच्या पाच व्याख्या लिहा.

२. साहित्यातील सेंद्रियत्व म्हणजे काय?

३. साहित्याचे स्वरूप स्पष्ट करा.

४. साहित्यातील सौंदर्यगुण कसे ओळखावे?

५. साहित्यातील कल्पकता कशास म्हणतात?

६. साहित्याची लेखकसापेक्ष प्रयोजने कोणती?

७. साहित्याची वाचकसापेक्ष प्रयोजने कोणती?

८. साहित्याच्या भाषेचे वेगळेपण स्पष्ट करा.

९. प्रतिभाशक्तीचे महत्व स्पष्ट करा.

१०. लेखकाची संवेदनक्षमता यावर टीपण तयार करा.

११. दैनंदिन व्यवहारभाषेचे स्वरूप स्पष्ट करा.

१२. साहित्यकृतीचा आवद याविषयी माहिती लिहा.

१३. भावयित्री प्रतिभा म्हणजे काय?

१४. साहित्य आणि समाज यांच्यातील परस्परसंबंध स्पष्ट करा.

१५. साहित्याची सामाजिकता म्हणजे काय?

१६. साहित्यिकाची बांधिलकी म्हणजे काय?

१७. तेनचा सिध्दांत स्पष्ट करा.

१८. बांधिलकीची संकल्पना स्पष्ट करा.

१९. साहित्यिक अभिरूचीची संकल्पना स्पष्ट करा.

२०. अभिरूची आणि सौंदर्यदृष्टी यांच्यातील संबंध स्पष्ट करा.

२१. अभिरूची आणि औचित्य यांच्यातील संबंध स्पष्ट करा.

२२. साहित्यप्रकाराची संकल्पना यावर टीप लिहा.

२३. साहित्याच्या वर्गीकरणाची आवश्यकता यावर आपले मत नोंदवा.

२४. साहित्याच्या वर्गीकरणाची तत्त्वे कोणती?

२५. साहित्यनिर्मिती प्रक्रियेचे घटक कोणते?

२६. कादंबरीचे स्वरूपविशेष लिहा.

२७. रसास्वादातील अडथळे कोणकोणते ते लिहा.

**Long Answer Questions.**

१. साहित्याच्या विविध व्याख्या सांगून साहित्याची स्वरूप वैशिष्ट्ये सविस्तर लिहा.

२. भारतीय साहित्यशास्त्रज्ञांनी सांगितलेल्या साहित्याच्या व्याख्या स्पष्ट करा.

३. भारतीय संस्कृत मीमांसकांनी साहित्याची कोणकोणती लक्षणे सांगितली आहेत?

४. पाश्चात्य साहित्यशास्त्रज्ञानी साहित्याची कोणकोणती लक्षणे सांगितली आहेत? स्पष्ट करा.

५. मम्मटानी सांगितलेल्या प्रयोजनांपैकी 'कांतासंमित उपदेश' हे प्रयोजन स्पष्ट करा.

६. प्राचीन साहित्यप्रयोजनाची विस्तृत चर्चा करा.

७. मम्मटांनी सांगितलेली प्रयोजने कोणती आहेत? ते सांगून त्यातील कोणते साहित्य प्रयोजन तुम्हाला श्रेष्ठ वाटते ते स्पष्ट करा.

८. साहित्याची आधुनिक प्रयोजने कोणती आहेत? ते स्पष्ट करा.

९. साहित्यनिर्मितीसाठी आवश्यक असणाऱ्या 'प्रतिभा' या शक्तीच्या संस्कृत मीमांसकांनी केलेल्या व्याख्या स्पष्ट करा.

१०. 'प्रतिभा म्हणजे काय?' ते सांगून साहित्य निर्मितीमध्ये प्रतिभेची वैशिष्ट्ये कोणकोणती आहेत? ते लिहा.

११. साहित्यनिर्मितीच्या शक्ती कोणकोणत्या? त्यात प्रतिभाशक्तीचे स्थान स्पष्ट करा.

१२. शब्दशक्ती किती? कोणकोणत्या? त्यातील व्यंजना शक्तीबद्दल सोदाहरण विवेचन करा.

१३. अभिधा, लक्षणा व व्यंजना यातील कोणती शब्दशक्ती तुम्हाला महत्वाची वाटते ते स्पष्ट करा.

१४. अभिधा, लक्षणा आणि व्यंजना या शब्दशक्तींचा आढावा घ्या.

१५. ललित साहित्यातून व्यक्त होणाऱ्या संवेदनात्मकता, सूचकता व सेंद्रियत्व या विशेषांचे स्वरूप स्पष्ट करा.

१६. आत्माविष्कार व उद्बोधन या प्रयोजनांचा परिचय करून द्या.

१७. भाषा ही समाजाची निर्मिती असल्यामुळे साहित्याला सामाजिकता टाळता येत नाही, या मताची चर्चा करा.

१८. साहित्यकृतीची आस्वाद हा साहित्यकृती व रसिक यांच्यामधील संवाद असतो, स्पष्ट करा.

१९. अभिरूची नियंत्रित करणाऱ्या घटकांचा परिचय करून द्या.

२०. साहित्यप्रकाराची संकल्पना संक्षेपाने विशद करा.

२१. शास्त्रीय वाङ्.मय व ललित साहित्य यांतील भेद स्पष्ट करा.

२२. साहित्यनिर्मितीमध्ये सहभागी होणाऱ्या शक्तींचा परिचय करून देऊन त्यापैकी प्रतिभाशक्तीचे स्वरूप व कार्य विशद करा.

२३. साहित्याचे स्वरूप व प्रयोजन यांतील भेद सांगून स्वप्नरंजन व मनोरंजन या प्रयोजनांचा परामर्श घ्या.

२४. अभिरूची म्हणजे काय ते सांगून वाङ्.मयीन अभिरूचीची संकल्पना स्पष्ट करा.

२५. 'कविता' या साहित्यप्रकाराचा परिचय करून द्या.

२६. साहित्य व समाज यांचा परस्परसंबंध लेखक व वाचक या दोन घटकांच्या आधारे स्पष्ट करा.

२७. साहित्यातील नवनिर्मितीचे स्वरूप स्पष्ट करा.

२८. साहित्याच्या संदर्भात निर्मिती व उत्पादन यांतील फरक स्पष्ट करा व स्फूर्ती शक्तीचे स्वरूप विशद करा.

२९. ललित साहित्य म्हणजे काय? साहित्यातील वास्तव व कल्पित यांतील संबंध स्पष्ट करा.

३०. जिज्ञासातृप्ती व विरेचन या प्रयोजनांचा परिचय करून द्या.

३१. बांधिलकी म्हणजे काय? साहित्यिकाच्या बांधिलकीचे स्वरूप स्पष्ट करा.

३२. आस्वादातील अडथळयांचा परामर्श घ्या.

३३. वाङ्.मयीन अभिरूची म्हणजे काय? अभिरूची व औचित्य यांतील संबंध स्पष्ट करा.

३४. साहित्यप्रकाराची संकल्पना स्पष्ट करून साहित्याच्या वर्गीकरणाची तत्त्वे लिहा.

३५. 'कादंबरी' या साहित्यप्रकाराची वैशिष्ट्ये सांगा.

३६. कविता या वाङ्.मय प्रकाराची वैशिष्ट्ये लिहा.

३७. कथेचे घटक सांगुन कथा या वाङ्.मयप्रकाराचे स्वरूप स्पष्ट करा.

३८. नाटक या वाङ्.मयप्रकाराची वैशिष्ट्ये लिहा.

-----------------------------------------